जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट दिनांक - ०७/०१/२०२४**

## विधी संघर्षग्रस्त बालकांना मार्गदर्शन

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ कार्यक्षेत्रा मध्ये शरिरा विरुध्द व मालमत्ते विरुध्दचे गुन्हयांमध्ये बाल गुन्हेगारांचा होत असलेला सहभाग तसेच विधी संघर्षग्रस्त बालका कडुन वारंवार होत असलेले गंभीर गुन्हे तसेच त्यांचे मध्ये होत असलेल्या अमंली पदार्थ सेवन या अनुषंगाने प्रत्येक पोलीस स्टेशन हद्दीमध्ये विधी संघर्षग्रस्त बालक व त्यांचे पालक यांचा मेळावा आयोजित करुन त्यांना गुन्हेगारी कृत्यापासुन परावृत्त करणेकामी तसेच अमंली पदार्थाच्या सेवना पासुन परावृत्त व्हावे याकरीता खाजगी समुपदेशक व पोलीस अधिकारी यांचे मार्फत विधी संघर्षग्रस्त बालक व त्यांचे पालक यांना समुपदेशन करणेत आले.सदर कार्यक्रमास खालील प्रमाणे विधी संघर्षग्रस्त बालक व पालक उपस्थित होते.

| पोलीस स्टेशन | विधी संघर्षग्रस्त बालक व त्यांचे पालक |
|---|---|
| चतु:श्रृंगी | ४० |
| खडकी | २६ |
| विश्रांतवाडी | २२ |
| येरवडा | २० |
| विमानतळ | २० |
| चंदननगर | २२ |
| लोणीकंद | ३० |
| **एकुण** | १८० |

वरील प्रमाणे उपस्थित विधी संघर्षग्रस्त बालक व पालक यांना खालील प्रमाणे मार्गदर्शन करणेत आले.

१) उपस्थित बालक व त्यांच्या पालकांना कायदे विषयक माहिती देऊन शिक्षणाचे महत्व समजावुन सांगितले.
२) पालकांनी बालकांविषयी आपली जबाबदारी ओळखुन त्यांच्यावर लक्ष ठेवण्याच्या सूचना दिल्या.
३) सध्या सोशल मीडियाचा गैरवापर व त्याचे माध्यमातुन समाजा मध्ये वाढत्या बाल गुन्हेगारी बाबत माहिती दिली.
४) अंमली पदार्थाचे सेवन त्यातुन वाढणारी व्यसनाधीनता पर्यायाने वाढणारी गुन्हेगारी याबाबत माहिती देण्यात आली.
५) बालकांचा पौष्टिक आहार कसा असला पाहिजे, व्यायामाचे काय महत्व आहे ? याबाबत माहिती देली.
६) वाहतुकीचे नियम,गुड टच,बॅड टच या विषयावर सूचना देऊन मार्गदर्शन केले.
७) बालकांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देऊन त्यांना गुन्हेगारी क्षेत्रापासुन परावृत्त कसे करता येईल याबाबत मार्गदर्शन करणेत आले.
८) बालकांच्या अडचणी जाणून घेतल्या तसेच पोलीस हेल्पलाइन व बालक हेल्पलाइन नंबर ११२, १०९१,१०९८ बाबत माहिती दिली.

**(शशिकांत बोराटे)**
**पोलीस उप आयुक्त परि ४**
**पुणे शहर**